INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCI

Impact Factor - 6.625 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

November -2019 Special Issue – 206

## Philosophy




Guest Editor :
Dr. Dhanaji Gurav
Principal,
Dr. Babasaheb Ambedkar College of Arts,
Science and Commerce, Mahad,
Dist. Raigad. (MS) India.

Executive Editor
Prof. Yogesh Borale
Asst. Prof. of Psychology,
Dr. Babasaheb Ambedkar College of Arts,
Science and Commerce, Mahad,
Dist. Raigad. (MS) India.

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) – 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 206 : Philosophy
ISSN : 2348-7143
November-2019

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान | डॉ. यशवंत मनोहर | 05 |
| 2 | Dr. B. R. Ambedkar and His Views on Yoga Philosophy | Dr. Sushim Dubey | 14 |
| 3 | Buddha Philosophy and Western Psychology | Mr. Yogesh Borale | 23 |
| 4 | Dr. Ambedkar's Perspective on Women Empowerment : A Retrospection | Dr. Rina Pitale-Puradkar | 29 |
| 5 | Fashioning Dignity : Gandhi Ambedkar | Dr. Harish Navale | 33 |
| 6 | डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या धर्मांतर संकल्पनेचा तात्त्विक व सामाजिक अन्वयार्थ | डॉ. वामन पाटील | 38 |
| 7 | तार्किक प्रत्यक्षार्थवाद एक वैचारिक चळवळ | डॉ. अमन बगाडे | 48 |
| 8 | धर्म विषयक आधुनिक उपपत्ती - तर्कतीर्थांची मांडणी | डॉ. नवनाथ रासकर | 52 |
| 9 | जे.कृष्णमूर्ती यांचे मृत्यू विषयक विचार | डॉ. ग्यानदेव उपाडे | 57 |
| 10 | भ्रष्टाचार – एक सामाजिक दुरित व त्यांच्या निर्मुलनासाठी तत्त्वज्ञानाची प्रस्तुतता | अरुण पाध्ये | 61 |
| 11 | बौद्ध दर्शनातील ब्रम्हविहार संकल्पना | डॉ. सुनिलदत्त गवरे | 75 |
| 12 | तत्त्वज्ञान महाजालावर ! नवी आव्हाने व नवी आवाहने आणि व्यावसायिक तत्त्वज्ञान व व्यावसायिक तत्त्ववेत्त्यांचे उत्तरदायित्व | श्रीनिवास हेमाडे | 79 |
| 13 | अस्तित्ववादाची शिक्षणविषयक भूमिका | प्रा. धनराज हाडूळे | 82 |
| 14 | तर्कशास्त्र : काल, आज आणि उद्याही | प्रा. सुनिल भोईटे | 87 |
| 15 | अस्तित्ववाद : मानवी जीवन गौरवाचे तत्त्वज्ञान | डॉ. रेखा शेरकर | 92 |
| 16 | विटगेन्स्टाइनची नीतिशास्त्रीय भूमिका | डॉ. सचिन खोकले | 97 |
| 17 | पर्यावरण नीतिशास्त्र | डॉ. विजय शेंडगे | 100 |
| 18 | तार्किक प्रत्यक्षार्थवादाचे प्रचीतीक्षमतेचे तत्त्व आणि सत्ताशास्त्राचे खंडण | डॉ. किरण सावे | 103 |
| 19 | पर्यावरण व उपयोजित नीतिशास्त्र | प्रा. जगन्नाथ कदम | 116 |
| 20 | सुधारणात्मक सिध्दांत (नैतीक दृष्टिकोन) | डॉ. वृशाली आंबटकर | 119 |
| 21 | टी. एच्. ग्रीन | संध्या जोशी | 122 |
| 22 | अस्तित्ववादाचा तत्त्वज्ञानात्मक विकास | डॉ. बाजीराव पाटील | 128 |
| 23 | पर्यावरणीय नैतिक तत्त्वज्ञान : एक चिकित्सक मागोवा | डॉ. सुनील भिसे | 131 |
| 24 | खरा पातंजल - योग : एक आधुनिक प्रवाह | डॉ. शर्मिला वीरकर | 136 |
| 25 | महानुभाव संप्रदायाच्या सामाजिक कार्याची तात्त्विक चौकट | डॉ. सचिन राजपूत | 142 |
| 26 | सार्त्रची 'स्वातंत्र्य' आणि उत्तरदायित्वाची संकल्पना | प्रा. शीतल येरुले | 146 |
| 27 | अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाच्या उदयाची कारणे | रोहित गायकवाड | 148 |
| 28 | अस्तित्ववादी तत्त्वज्ञानातील 'मृत्यू' संकल्पनेविषयींचे विविध दृष्टीकोन | डॉ.माधव कांबळे | 151 |
| 29 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बुद्ध धर्माचा स्वीकार करण्यामागचे तत्त्वज्ञान | प्रा. धनराज लझडे | 156 |
| 30 | संत तुकारामांची 'संत' संकल्पना | श्रीनिवास भिसे | 162 |




Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 206 : Philosophy
ISSN : 2348-7143
November-2019

# विट्गेन्स्टाइनची नीतिशास्त्रीय भूमिका

प्रा. डॉ. सचिन खोकले
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
श्री संत जनाबाई महाविद्यालय,गंगाखेड जि.परभणी

सी. के. ऑग्डेन यांच्या निमंत्रणावरुन विट्गेन्स्टाइन यांनी १७ नोव्हेंबर १९२९ रोजी केंब्रिज येथील 'हर्टिक्स सोसायटी'पुढे नीतिशास्त्रावर एक व्याख्यान दिले. तेच व्याख्यान 'A Lecture on Ethics' म्हणून 'फिलॉसॉफिकल रिव्ह्यू'मध्ये १९६५ साली प्रकाशित झाले. 'नोटबुक्स १९१४-१६', 'ट्रॅक्टेट्स लॉजिको-फिलॉसॉफिकस', 'लेक्चर ऑन एथिक्स', 'लेक्चर अँड कन्व्हर्सेशन्स ऑन ॲस्थेटिक्स' आणि श्लीक व वाईजमन यांच्यासोबत नीतिशास्त्राच्या संदर्भात झालेली त्रोटक चर्चा एवढाच तपशील विट्गेन्स्टाइनच्या नीतिशास्त्रीय भूमिकेच्या संदर्भात उपलब्ध आहे. विट्गेन्स्टाइन यांनी नीतिशास्त्रावर फार कमी लिहिले आहे. याचे कारण हे आहे की ते नीतिशास्त्राच्या भाषिक अभिव्यक्तीचा अस्वीकार करतात. 'Ethical judgements cannot make sense' अशी त्यांची स्पष्ट भूमिका आहे. हीच गोष्ट स्पष्ट करण्याचा प्रयत्न त्यांनी 'A Lecture on Ethics' मध्ये केलेला आहे. विट्गेन्स्टाइन हे नीतिशास्त्राच्या एकंदर स्वरुपाबद्दल, शक्यतेबद्दल मते मांडतात; ते काही नीतिशास्त्रीय समस्या, सिध्दांत किंवा संकल्पनांबद्दल मते मांडत नाहीत.

आपल्या व्याख्यानाची सुरुवातच विट्गेन्स्टाइन हे जी. ई. मूर यांनी नीतिशास्त्राची जी व्याख्या केलेली आहे, त्या व्याख्येचा परामर्श घेऊन करतात. ते म्हणतात-

"My subject as you know, is Ethics and I will adopt the explanation of that term which Professor Moore has given in his book 'Principia Ethica'. He says: "Ethics is the general enquiry into what is good." Now I am going to use the term Ethics in a slightly wider sense, in a sense in fact which includes what I believe to be the most essential part of what is generally called Aesthetics. And to make you see as clearly as possible what I take to be the subject matter of Ethics... Now instead of saying "Ethics is the enquiry into what is good." I could have said Ethics is the enquiry into the meaning of life, or into what makes life worth living, or into the right way of living."

विट्गेन्स्टाइन यांच्या 'अ लेक्चर ऑन एथिक्स'मधील वरील परिच्छेदावरुन काही महत्त्वाच्या बाबी स्पष्ट होतात. आधुनिक कालखंडात नीतिशास्त्राच्या संदर्भात मूलगामी चिंतन करणाऱ्या विचारवंतांमध्ये प्रसिद्ध जर्मन तत्त्वचिंतक इमॅन्यूएल कांट, जी. ई. मूर, विट्गेन्स्टाइन यांचा समावेश होतो. मूर यांचा 'Principia Ethica' हा ग्रंथ १९०३ मध्ये प्रकाशित झाला आणि त्यापासून नीतिशास्त्राच्या एका नव्या युगाला प्रारंभ झाला असे मानले जाते. याच ग्रंथात जी. ई. मूर यांनी नीतिशास्त्राची व्याख्या करताना असे म्हटले की, "सामान्यतः जे काही चांगले आहे त्याची चिकित्सा म्हणजे नीतिशास्त्र होय." ही व्याख्या विट्गेन्स्टाइन स्वीकारतात, परंतु त्यांचे असे मत आहे की मूर यांची व्याख्या मर्यादित अर्थ व्यक्त करत असल्याने नीतिशास्त्राचे स्वरुप पूर्णपणे व्यक्त करू शकत नाही. विट्गेन्स्टाइन नीतिशास्त्राचा व्यापक अर्थ करतात आणि या व्यापक अर्थानेच ते नीतिशास्त्रात सौंदर्यशास्त्राचाही समावेश करतात. 'ट्रॅक्टेट्स'मध्ये ते असे म्हणतात की, "Ethics and



Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
November-2019

Aesthetics are one and the same."[36] (TLP-6.421) यवरून हे सिद्ध होते की विट्गेन्स्टाइन यांना नीतिशास्त्र आणि सौंदर्यशास्त्र हे एकाच समान पातळीवरील विषय आहेत, हे अभिप्रेत होते. 'लेक्चर ऑन एथिक्स' मध्ये त्यांनी नीतिशास्त्राच्या पाच वेगवेगळ्या प्रकारच्या व्याख्या दिलेल्या आहे. त्यांच्या मते या व्याख्या एक दुसऱ्याच्या पर्यायवाची आहेत. वास्तविक विभिन्न प्रकारच्या व्याख्यांच्या माध्यमातून विट्गेन्स्टाइन नीतिशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतात. विट्गेन्स्टाइन यांनी दिलेल्या नीतिशास्त्राच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

"Now instead of saying "Ethics is the enquiry into what is good" I could have said Ethics is the enquiry into what is valuable, or, into what is really important, or I could have said Ethics is the enquiry into the meaning of life, or into what makes life worth living, or into the right way of living."

अशा प्रकारे विट्गेन्स्टाइन यांच्या मते नीतिशास्त्र म्हणजे, जे मूल्यावान (Valuable) आहे, वास्तविक महत्त्वपूर्ण (Really Important) आहे, जे जीवन मूल्यांशी संबंधित (Meaning of life) आहे, जे जीवन जगण्यास लायक (Makes life worth living) बनवते किंवा जी जीवन जगण्याची योग्य पद्धती (Right way of living) आहे, त्याची चिकित्सा आहे.

विट्गेन्स्टाइन यांनी नीतिशास्त्राच्या दिलेल्या वरील व्याख्यांचा विचार केल्यानंतर आपल्या असे लक्षात येते की, विट्गेन्स्टाइन हे नीतिशास्त्रीय व्याख्यांच्या माध्यमातून कोणताही नीतिशास्त्रीय सिद्धांत प्रस्थापित करण्याचा कसलाही प्रयत्न करत नाहीत. मुळात वरील व्याख्या ह्या नीतिशास्त्राचे सार नसून त्या नीतिशास्त्राचे सर्वसाधारण स्वरूप व्यक्त करतात. या संदर्भात डॉ. के. सी. पाण्डेय असे म्हणतात की, "विट्गेन्स्टाइन के द्वारा उपर्युक्त जो परिभाषाएँ सुझाई गई है, वे, वास्तव में, परिभाषाएँ न होकर नीतिशास्त्र के बारे में ऐसी प्रतिज्ञप्तियाँ है जो इसकी प्रकृती की तरफ संकेत करती है। इनके द्वारा पारिवारिक-सादृश्यता के सम्प्रत्यय के द्वारा विट्गेन्स्टाइन नीतिशास्त्र की प्रकृति को स्पष्ट करने का प्रयास करते है। वे नीतिशास्त्र की कोई विशिष्ट परिभाषा नहीं देते।"[37] म्हणजेच विट्गेन्स्टाइन यांनी नीतिशास्त्राची केवळ एखादी विशिष्ट व्याख्या न देता 'कौटुंबिक सादृश्य' या प्रमाणे नीतिशास्त्राचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यांना नीतिशास्त्राच्या व्याख्या म्हणण्यापेक्षा नीतिशास्त्राचे स्वरुप स्पष्ट करणारी विधाने म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. उपर्युक्त व्याख्यांच्या माध्यमातून विट्गेन्स्टाइन नीतिशास्त्राच्या न-नैसर्गिक आणि उपाधिमागी (Transcendental) वैशिष्ट्यांचा निर्देश करतात.

**संदर्भ:**

१. लुडविग विट्गेन्स्टाइन, अ लेक्चर ऑन एथिक्स, जेम्स क्लॅगी आणि अल्फ्रेड नॉर्डमन संपा. फिलॉसॉफिकल ऑकेझन्स-१९१२-१९५१ (मध्ये समाविष्ट), हॅकेट पब्लिशिंग कं. केंब्रिज, १९९३, पृ. ३८

२) लुडविग विट्गेन्स्टाइन, ट्रॅक्टेट्स लॉजिको-फिलॉसॉफिकस, अनुवाद: डी.एफ.पिअर्स अँड बी.एफ.मॅकगुनीज, रुटलेज अँड केगन पॉल, लंडन,१९७४, पृ.७१

४) काली चरण पाण्डेय, विट्गेन्स्टाइन के दर्शन की रुपरेखा, न्यू भार्गव बुक कॉर्पोरेशन, दिल्ली ,२००५, पृ.२२



Scanned by CamScanner

२. लुडविग विट्गेन्स्टाइन, ट्रॅक्टेट्स लॉजिको-फिलॉसॉफिकस, अनुवादः डी.एफ.पिअर्स अँड बी.एफ.मॅकगुनीज,

३. रुटलेज अँड केगन पॉल, लंडन,१९७४, पृ.७१

४. लुडविग विट्गेन्स्टाइन, अ लेक्चर ऑन एथिक्स, उपरोक्त, पृ. ३८

५. काली चरण पाण्डेय, विट्गेन्स्टाइन के दर्शन की रुपरेखा, न्यू भारतीय बुक कॉरपोरेशन, दिल्ली, २००५, पृ.१३८



Scanned by CamScanner